मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
www.newsexpressmarathi.in
» पुणे, पिंपरी–चिंचवड » गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२३। पान १

# गणेश विसर्जनासाठी शहरातील वाहतुकीत बदल!

## जाणून घ्या शहरातील वाहतुकीत कुठला मार्ग कधी बंद

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

गणेशोत्सव उत्साहात सुरु आहे. दरम्यान बुधवार (दि. २०) पासून गणेश विसर्जनाला सुरुवात झाली आहे. बुधवारी दीड दिवसाच्या बाप्पाला निरोप दिला जाणार आहे. तसेच विसर्जनाच्या वेळी मिरवणुका निघाल्याने वाहतूक कोंडी होते. त्यासाठी गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी वाहतुकीत बदल केले आहेत. याबाबतचे आदेश पोलीस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी दिले आहेत. भोसरी वाहतूक विभाग वाहतूक बदलाचा कालावधी – २३, २५, २८ सप्टेंबर रोजी दुपारी दोन ते रात्री अकरा वाजेपर्यंत वाहतुकीत बदल असतील

बंद मार्ग – फुगेवाडी दापोडी ओव्हरब्रिज मार्गे शितळादेवी चौकाकडून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पुण्याकडे जाणारा मार्ग पर्यायी मार्ग – शितळादेवी चौकातून उजवीकडे वळून सांगवी मार्गे. फुगेवाडी चौकातून हॅरीस ब्रिजच्या अंडरपासमधून बोपोडी मार्गे.तळवडे/महाळुंगे वाहतूक विभाग वाहतूक बदलाचा कालावधी – २५ सप्टेंबर रोजी दुपारी चार ते २६ सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजेपर्यंत बंद मार्ग – एचपी चौक येथून तळेगाव – चाकण रोडवर येणाऱ्या जड वाहनांना प्रवेश बंदीपर्यायी मार्ग – एचपी चौकातून आंबेठाण चौक-चाकण-शिंदे वासुली-नवलाख उंबरे-तळेगाव एमआयडीसी सर्कल मार्गे. एचपी चौकातून-भामचंद्र डोंगर मार्गे बदलवाडी-नवलाख उंबरे-तळेगाव एमआयडीसी सर्कल मार्गे.बंद मार्ग – मुंबई कडून येणाऱ्या जड अवजड वाहनांना वडगाव फाटा पुणे ग्रामीण हद्दीतून चाकण, नाशिककडे जाण्यासाठी प्रवेश बंदपर्यायी मार्ग – तळेगाव एमआयडीसी-नवलाख उंबरे-आंबेठाण चौक-शिंदे वासुली मार्गे. वडगाव फाटा-सोमाटणे फाटा-सेन्ट्रल चौक-भक्ती शक्ती-त्रिवेणीनगर मार्गे.सांगवी वाहतूक विभाग वाहतूक बदलाचा कालावधी – २५ सप्टेंबर रोजी दुपारी चार ते रात्री बारा वाजेपर्यंत बंद मार्ग – कृष्णा चौकाकडून फेमस चौकाकडे जाणारा मार्ग बंद पर्यायी मार्ग – पाण्याची टाकी जुनी सांगवी मार्गे सांगवी



महात्मा फुले ब्रिजमार्गे. बंद मार्ग – माहेश्वरी चौकाकडून माकण हॉस्पिटल चौक जुनी सांगवीकडे जाणारा मार्ग

पर्यायी मार्ग – बँक ऑफ महाराष्ट्र जुनी सांगवी मार्गे औंध किंवा पाण्याची टाकी जुनी सांगवी मार्गे सांगवी महात्मा फुले ब्रिज मार्गे.बंद मार्ग – कृष्णा चौकाकडून साई चौक ते माहेश्वरी चौकाकडे जाण्यास बंदी.पर्यायी मार्ग – काटेपूरम चौकातून डावीकडे वळून मयूरनगरी-एमके हॉटेल उजवीकडे वळून ढोरे फार्म-बा रा घोलप-महात्मा फुले ब्रिज मार्गे. बंद मार्ग – कृष्णा चौकाकडून क्रांती चौक/फेमस चौकाकडे जाणारा मार्ग बंदी.

पर्यायी मार्ग – काटे पूरम चौकातून डावीकडे वळून मयूरनगरी-एमके हॉटेल उजवीकडे वळून ढोरे फार्म-बा रा घोलप-महात्मा फुले ब्रिज मार्गे. बंद मार्ग – कृष्णा चौकाकडून साई चौकाकडे जाणारा मार्ग बंदी.पर्यायी मार्ग – काटेपूरम चौकातून डावीकडे वळून मयूरनगरी-एमके हॉटेल उजवीकडे वळून ढोरे फार्म-बा रा घोलप-महात्मा फुले ब्रिज मार्गे.बंद मार्ग – साई चौक तसेच कृष्णा चौकाकडून जुनी सांगवी पाण्याच्या टाकीकडे जाण्यास बंदी. पर्यायी मार्ग – बा रा घोलप-ढोरे फार्म-एमके हॉटेल-मयूरनगरी-काटे पूरम चौक मार्गे. बंद मार्ग – पाण्याची टाकी जुनी सांगवी ते बँक ऑफ महाराष्ट्र चौक तसेच शितोळे पेट्रोल पंपाकडे जाण्यास बंदी.पर्यायी मार्ग – साई चौकातून पाण्याची टाकी जुनी सांगवी पोलीस चौकीजवळून महात्मा फुले ब्रिज कडून औंध मार्गे.वाकड वाहतूक विभाग वाहतूक बदलाचा कालावधी – २८ सप्टेंबर रोजी दुपारी चार ते रात्री बारा वाजेपर्यंतबंद मार्ग – साठे चौक येथून दत्त मंदिर रोडवर जाण्यास मनाई.पर्यायी मार्ग – कावेरीनगर किंवा काळा खडक चौक मार्गे.बंद मार्ग – वाकड चौकाकडून दत्त मंदिर रोडवर जाण्यास मनाईपर्यायी मार्ग – वाकड चौकातून कस्पटे कॉर्नर मार्गे.बंद मार्ग – उत्कर्ष चौकाकडून दत्त मंदिर रोड वाकड येथे येणाऱ्या वाहनांना म्हातोबा चौक येथून प्रवेश बंदी.पर्यायी मार्ग – कस्पटे कॉर्नर मार्गे.गोलारीस हॉस्पिटल चौक दत्त मंदिर रोड तसेच सम्राट चौक दत्त मंदिर रोड येथील वाहतूक गरजेनुसार वळवली जाणार आहे.चिंचवड वाहतूक विभागवाहतूक बदलाचा कालावधी – २८ सप्टेंबर रोजी दुपारी तीन ते रात्री बारा वाजेपर्यंत बंद मार्ग – अहिंसा चौक ते चापेकर चौकाकडे जाणारा मार्ग बंदपर्यायी मार्ग – एसएएफ चौकातून खंडोबा माळ मार्गे.

बंद मार्ग – दळवीनगर ब्रिजकडून चापेकर चौकाकडे जाणारा मार्ग बंद.

पर्यायी मार्ग – एसकेएफ चौकाकडून बिजलीनगर मार्गे.

बंद मार्ग – वाल्हेकरवाडी टी जंक्शनकडून चापेकर चौकाकडे जाण्यास बंदी. पर्यायी मार्ग – वाल्हेकरवाडी जुना जकात नाका डावीकडे वळून जैन शाळेपासून बिजलीनगर अथवा एसकेएफ-खंडोबा माळ मार्गे. बंद मार्ग – लिंकरोडवरून चापेकर चौकातील पीएमटी बस थांबा येथून चापेकर चौकात जाण्यास बंदी पर्यायी मार्ग – लिंकरोडने डावीकडे वळून काळेवाडी मार्गे. बंद मार्ग – भोई आळी तसेच चिंचवड चौकी येथून चापेकर चौकात जाण्यास बंदी पर्यायी मार्ग – केशवनगर मार्गे बंद मार्ग – चिंतामणी चौक-वाल्हेकरवाडी रिव्हर व्ह्यू चौकाकडे जाण्यास बंदी. पर्यायी मार्ग – चिंचवडेफार्म वाल्हेकरवाडी लंडन ब्रिज रावेत मार्गे.बंद मार्ग – अहिंसा चौक व रिव्हर व्ह्यू चौकाकडून चापेकर उड्डाणपुलावरून जाण्यास बंदी.

# वुड्सविले सोसायटीतील जेष्ठांकडून एकांकिका सादर!

## पु.ल.देशपांडेच्या माझी पाठ धरते या एकांकिकेच्या सादरीकरणानंतर जल्लोष

**मोशी। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

गणेशोत्सवानिमित्त सर्वत्र जल्लोष आणि आनंदाचे वातावरण सुरु आहे. मंडळ, सोसायट्यांमध्ये विविध उपक्रम, स्पर्धा राबविल्या जात आहेत. मोशीतील वुड्सविले फेज १ मध्ये जेष्ठांनी एकांकिका सादरीकरण करून महाविद्यालयीन दिवसांच्या



आठवणी जाग्या केल्या. पु.ल.देशपांडे यांचे माझी पाठ धरते ही एकांकिका जेष्ठांनी उत्तम प्रकारे सादर करून सोसायटीतील सदस्यांची दाद मिळवली. वय हा फक्त एक आकडा असतो. मन तरूण असेल तर म्हातारपणातही एवढा उत्साह निर्माण होऊ शकतो हा संदेश सोसायटीतील जेष्ठांनी समाजाला दिला. सादर केलेल्या एकांकिचे दिग्दर्शन राजूभाई गुजराथी यांनी केले. नाटकामध्ये मंगेश उदगीरकर, विजय पाटील, हरिचंद्र आहेर, दिलीप गुजराती, सुहास जोशी, मंगला मिरकुटे, विलास मिरकुटे, गीतांजली डेंगळे, लता आहेर या कलाकारांचा सहभाग होता. गणेशस्थापनेच्या दिवशी जेष्ठांच्या नाटकासोबतच जेष्ठ महिलांचे भजन, भारूड, आणि नृत्य सादरीकरण झाले. सोसायटीमध्ये चैतन्य ठेवणारे चेअरमन माऊली लांडे यांच्यासह गणेश उत्सव सांस्कृतिक समिती, सोसायटीतील पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# पिंपरी-चिंचवडमधील पोलिसांना बाप्पा पावला!

## ३९० पोलीस शिपाई, नाईकपदावरुन हवालदार पदी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील ३९४ पोलिसांना गणपती पावला आहे. गणरायाच्या आगमनाच्या दिवशी ३९० जणांना पोलीस शिपाई, नाईकपदावरुन हवालदार, तर चार अंमलदारांना पोलीस उपनिरीक्षक पदावर बढती मिळाली आहे. याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी प्रसृत केले. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला पाच वर्षे झाले तरी मनुष्यबळाची कमतरता आहे. पोलीस शिपाई पदासाठी दोनवेळ्या भरती झाली. इतर जिल्ह्यांतून बदलीवर येणारे, पोलीस भरतीमधून मिळालेल्या पोलिसांची मोट बांधून आयुक्तालयाचा गाडा हाकला जात आहे. विविध सण, अतिमहत्वांच्या नेत्यांच्या दौ-यावेळी आयुक्तालयाला बाहेरून अधिकची कुमक मागवावी लागते. बंदोबस्तासह घडणाऱ्या गुन्ह्यांच्या तपासासाठी देखील राखीव मनुष्यबळ ठेवावी लागते. त्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी ३९४ जणांना बढती दिली. पोलीस दलात २५ मे २००४ पूर्वी रुजू झालेल्यांना सेवाज्येष्ठतेनुसार बढती मिळाली आहे. पोलीस शिपाई आणि नाईक पदावरून ३९० जणांना हवालदारपदी, तर पोलीस दलात ३० वर्षे सेवा पूर्ण करणारे, सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण करणाऱ्या चार जणांना पोलीस उपनिरीक्षक पदावर बढती दिली आहे. मनोज बनसोड, ज्ञानेश्वर पोटे, वाहतूक शाखेतील गजेंद्र जाधवर आणि वाकड पोलीस ठाण्यातील अरुण भालेराव यांना ही बढती मिळाली आहे. पोलिसांना पदोन्नती साखळीमध्ये सामान्यतः पोलीस शिपाई-पोलीस नाईक-पोलीस हवालदार-सहायक पोलीस उपनिरीक्षकासह तीन पदोन्नतीच्या संधी मिळतात. सर्वसाधारणपणे एका पदावर दहा वर्षे सेवा कालावधी झाल्यानंतर पदोन्नती मिळते. पोलीस शिपाई पदावर भरती झालेल्यांना पोलीस उपनिरीक्षक होण्यासाठी वयाच्या अडचणी येतात. त्यामुळे त्यांचे अधिकारी होण्याचे स्वप्न अपूर्णच राहते. त्यासाठी पोलीस दलातील पदोन्नती साखळीतील पोलीस नाईक हे पद गृह विभागाने रद्द केले. सध्या कार्यरत असलेले पोलीस शिपाई, नाईक या दोन्ही संवर्गातील पोलिसांना हवालदार पदावर बढती दिली जात आहे.





### पोलीस नाईक पद रद्द

» शिपाई-पोलीस नाईक-पोलीस हवालदार-सहायक पोलीस उपनिरीक्षकासह तीन पदोन्नतीच्या संधी मिळतात. सर्वसाधारणपणे एका पदावर दहा वर्षे सेवा कालावधी झाल्यानंतर पदोन्नती मिळते. पोलीस शिपाई पदावर भरती झालेल्यांना पोलीस उपनिरीक्षक होण्यासाठी वयाच्या अडचणी येतात. त्यामुळे त्यांचे अधिकारी होण्याचे स्वप्न अपूर्णच राहते. पोलीस दलातील पदोन्नती साखळीतील पोलीस नाईक हे पद गृह विभागाने रद्द केले.

# इको फ्रेंडली गणेशोत्सवासाठी शिवसेनेचाही हातभार!

## शिवसेनेच्या ना नफा ना तोटा तत्त्वावरील शाडू मूर्ती खरेदीसाठी गणेशभक्तांची झुंबड..

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्याचे लाडके मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे सर्वो सर्वा एकनाथजी शिंदे यांनी प्लास्टर ऑफ पॅरीसपासून (पीओपी) बनविलेल्या मूर्तीवर बंदी असल्याने या मूर्ती खरेदी करू नयेत, शाडू मातीच्या मूर्तीलाच गणेशभक्तांनी प्राधान्य द्यावे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे जनतेला नुकतेच आवाहन केले होते. या आवाहनाला साद देत पिंपरी चिंचवड शहरातील गणेशभक्तांसाठी शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद यांच्या पुढाकारातून शहर शिवसेनेने ना नफा ना तोटा या तत्त्वावर पर्यावरणपूरक शाडू मातीच्या गणेशमूर्ती मुबलक प्रमाणात बाजारपेठेत उपलब्ध करून दिल्या. त्यास गणेशभक्तांचा मोठा प्रतिसाद मिळाला. अनेक गणेशभक्त, गणेश मंडळ यांनी या शाडू मातीच्या गणेशमूर्तींची आज विधिवत पूजन करुन स्थापना केली.



गणेशोत्सव म्हणजे लहान थोर यांच्यासाठी आनंदाची पर्वणीच असते. पर्यावरणाची हानी होऊ नये यासाठी शहर शिवसेनेने पिंपरी, चिंचवड, भोसरी या मतदारसंघात ठीक-ठिकाणी शाडूच्या मातीच्या गणेशमूर्ती गणेशभक्तांसाठी अल्पदरात उपलब्ध करून दिल्या होत्या. दगडूशेठ, सिंहासन, टिटवाळा, फेटा, मुकुट, अंभूजा अशा विविध छटा साकारलेल्या मनमोहक गणेशमूर्ती खरेदीसाठी गणेशभक्तांची झुंबड उडाली होती. मोठ्या आनंदात घरोघरी या मुर्त्यांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यामुळे आज खऱ्या अर्थाने पर्यावरणाची हानी न होता इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा होण्यास शिवसेनेचा हातभार लागला आणि हे अभियान काही प्रमाणात यशस्वी ठरले, अशी माहिती शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद यांनी दिली.

> “माझ्या राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी लोकांच्या सेवेत कार्यरत असणाऱ्या माझ्या सरकारला असेच लोकसेवा करण्याचे बळ मिळो, अशी प्रार्थना बाप्पाचरणी करून सर्वांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा देतो''..
> - मा. इरफानभाई सय्यद (शिवसेना उपनेते)

''आपला उत्सव आनंदात आणि पर्यावरणाचे रक्षण करत साजरा करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. पक्षश्रेष्ठी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणात शाडू मातीच्या मूर्ती बनविण्यासाठी पुढाकार घेतला.

कच्चा माल, विविध साहित्य आणि त्यासाठी लागणारे मूर्तिकार यांची व्यवस्था केली. तयार गणेश मूर्ती भक्तांपर्यंत पोहोचविण्यासाठी महापालिकेचीही मदत मिळाली. त्या माध्यमातून स्टॉल व जागेचा प्रश्न सोडविला. पालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनीही त्यात योगदान दिले. गणेशभक्त, गणेश उत्सव मंडळ यांनी त्यास हातभार लावला.

# पुण्यात महामेट्रो मार्गाचा तिढा!

## पीएमआरडीए, महामेट्रोची समान मार्गांकडे धाव

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) आणि महामेट्रो यांच्याकडून दोन समान मार्गांवर मेट्रो उभारणीचे प्रकल्प विकास आराखडे सादर करण्यात आले आहेत. त्यामुळे एकच संस्था या मार्गांचे काम करेल हे निश्चित करण्यात आले. आता हे मार्ग फायदेशीर ठरतील की नाही, हे तपासण्यासाठी पीएमआरडीएने सल्लागार नेमण्याचे पाऊल उचलले आहे. सल्लागारांचा अहवाल आल्यानंतर या मार्गांवर मेट्रो उभारणी कोण करणार, याचा निर्णय घेतला जाणार आहे. पीएमआरडीएचे शिवाजीनगर ते लोणीकाळभोर आणि स्वारगेट ते सासवड या मार्गांचे प्रस्ताव आहेत. पीएमआरडीएने या मार्गांचा प्रकल्प विकास आराखडा



दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून तयार करून घेतला होता. याचवेळी महामेट्रोचा खडकवासला ते खराडी हा मार्ग प्रस्तावित आहे. त्यात खडकवासला ते स्वारगेट, स्वारगेट ते हडपसर, हडपसर ते खराडी आणि हडपसर ते लोणी काळभोर या टप्प्यांचा समावेश आहे. महामेट्रोने या मार्गाचा प्रकल्प विकास आराखडा खासगी सल्लागार संस्थेकडून तयार करून घेतला होता. दोन्ही संस्थांनी महापालिकेकडे हे प्रकल्प विकास आराखडे सादर केले होते. पीएमआरडीए आणि महामेट्रोचे प्रस्तावित मेट्रो मार्ग स्वारगेट-पूलगेट-हडपसरपर्यंत समान आहेत. पुढे दोन्ही मार्ग लोणी काळभोरपर्यंत जात आहेत. त्यामुळे जवळपास समान मार्गांवर दोन्ही संस्थांनी आराखडे तयार केले आहेत. पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरणाच्या (पुमटा) बैठकीत विभागीय आयुक्तांनी एकत्र येत असलेल्या मार्गांवर एकाच संस्थेने काम करावे, असे निर्देश दिले होते. हा प्रकल्प सार्वजनिक खासगी भागीदारीतून (पीपीपी) करण्यासाठी सल्लागार नेमण्याची सूचना त्यांनी पीएमआरडीएला केली होती. त्यानुसार, या मार्गाची आर्थिक व्यवहार्यता तपासण्यासाठी सल्लागार नेमण्याची पावले पीएमआरडीएने उचलली आहेत. यात त्या मेट्रो मार्गांच्या उत्पन्नासोबत इतर माध्यमातून मिळू शकणारा महसूलही पाहिला जाणार आहे.

> **“ महामेट्रो आणि पीएमआरडीए यांच्याकडून दोन समान मेट्रो मार्गांचे प्रकल्प विकास आराखडे तयार करण्यात आले होते. पुमटाच्या बैठकीत एकच संस्था हे काम करेल, हे निश्चित करण्यात आले. आर्थिक व्यवहार्यता तपासून पीएमआरडीए हे काम करण्याचा निर्णय घेईल. त्यांनी हे काम न केल्यास महामेट्रो ते करेल. -अतुल गाडगीळ, संचालक (कार्य), महामेट्रो**

> **“ स्वारगेट ते पूलगेटपर्यंत मेट्रो मार्गाचे काम करावे आणि रामवाडीपासून पुढे मगरपट्ट्यापर्यंत मेट्रो मार्गाचा विस्तार करावा, असा प्रस्ताव आहे. तिथून पुढे पीएमआरडीएला लोणी काळभोर आणि सासवडपर्यंत मेट्रो मार्गांचे काम करता येऊ शकते. सल्लागार नेमून या मार्गांची आर्थिक व्यवहार्यता तपासण्यात येणार आहे. त्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल. -रिनाज पठाण, अधीक्षक अभियंता, पीएमआरडीए**

# गणेशोत्सवात मोकाट जनावरांचा अडथळा!

## मालकांवर दंडात्मक कारवाईचा महापालिकेचा निर्णय

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

गणेशोत्सवाच्या कालावधीत वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागणाऱ्या वाहनचालकांना मोकाट जनावरांचा अडथळाही सहन करावा लागत आहे. मोकाट जनावरांमुळे उत्सवातही अडथळा निर्माण होत असल्याने रस्त्यावर सोडण्यात आलेल्या जनावरांवर कारवाई करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार जनावरे जप्त करण्यात येणार असून, मालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक उपद्रव टाळता येईल, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे. शहरात रस्त्यावर जनावरे सोडून देण्यात येत असल्याचे प्रकार अलीकडे वाढले आहेत.



लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, नदीपात्राबरोबरच सेनापती बापट रस्ता, लकडी पूल या भागात रस्त्यावर सोडून दिलेली जनावरे फिरताना सातत्याने आढळत आहेत. सार्वजनिक रस्त्यावर, बसथांब्या लगत आणि रस्ता दुभाजकाजवळ जनावरे भटकत असतात. गणेशोत्सवात शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांचे देखावे पाहण्यासाठी उपनगरांबरोबरच बाहेरच्या शहरांतूनही मोठ्या प्रमाणावर नागरिक येत असतात. त्यामुळे उत्सवाच्या कालावधीत शहरातील वाहतुकीचा वेग कमी होतो. तसेच ठिकठिकाणी वाहतूक कोंडीलाही सामोरे जावे लागते. त्यातच रस्त्यावर सोडण्यात येत असलेल्या जनावरांमुळे अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता रस्त्यावर फिरणाऱ्या विविध प्रकारच्या जनावरांवर कारवाई करण्याचा निर्णय महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने घेतला आहे. रस्त्यावर फिरणाऱ्या जनावरांबाबत तक्रार करण्याचे आवाहनही महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार ही कारवाई करण्याचे अधिकार महापालिकेला आहेत. त्यानुसार मालकांवरही दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. अतिक्रमण विभागाकडून त्यासाठी पथके करण्यात आली असून रस्त्यावर फिरणारी जनावरे जप्त करण्यात येणार आहेत. गणेशोत्सव संपेपर्यंत जनावरे सोडण्यात येणार नाहीत. तसेच मालकांकडूनही मोठा दंड आकारला जाईल, असे अतिक्रमण विभागाचे प्रमुख माधव जगताप यांनी सांगितले. जनावरे रस्त्यांबरोबरच पदपथांवरही फिरत असल्याने पादचाऱ्यांनाही त्रास होतो. त्यामुळे पादचाऱ्यांनी महापालिका प्रशासनाकडे ९६८९९३१९५७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही अतिक्रमण विभागाकडून करण्यात आले आहे.

### अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता

**» गणेशोत्सवात शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांचे देखावे पाहण्यासाठी उपनगरांबरोबरच बाहेरच्या शहरांतूनही मोठ्या प्रमाणावर नागरिक येत असतात. त्यामुळे उत्सवाच्या कालावधीत शहरातील वाहतुकीचा वेग कमी होतो. तसेच ठिकठिकाणी वाहतूक कोंडीलाही सामोरे जावे लागते. त्यातच रस्त्यावर सोडण्यात येत असलेल्या जनावरांमुळे अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता आहे.**

# आरक्षणासाठी धनगर समाज आक्रमक!

## मेंढ्या, बकऱ्यांसह पुणे-सातारा महामार्ग रोखला



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग धनगर समाजाने आरक्षणाच्या मागणीसाठी अडवून धरत जोरदार घोषणाबाजी केली. हजारोंच्या संख्येने धनगर समाज पुणे - सातारा महामार्गावर उतरला होता. बकरी, मेंढ्या, घोडे अशा पाळीव जनावरांसह पारंपारिक पेहरावात रस्त्यावर उतरलेल्या धनगर समाजाने शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. महामार्ग रोखल्याने साधारणपणे दीड ते दोन तास पुणे सातारा महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. खंडाळ्याकडून पुण्याकडे जाणाऱ्या आणि पुण्याहून साताऱ्याकडे जाणाऱ्या महामार्गावर वाहतुकीची प्रचंड कोंडी झाल्याने वाहतूक सुरळीत करता करता खंडाळा पोलिसांची चांगलीच धावपळ झाली. खंडाळ्याजवळील धनगरवाडी येथील माजी उपसरपंच जिजाबा काळे यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. प्रथम खंडाळा येथील मुख्य चौकात आणि नंतर महामार्गावर धनगर समाज आपल्या मेंढ्या , बकऱ्या आणि घोड्यांसह उतरला होता. पारंपारिक वेशात या समाजाने भैरोबाच्या नावानं चांगभलं, बिरोबा च्या नावानं चांगभलं म्हणून महाराष्ट्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. दरम्यान, अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी येथे यशवंत सेनेच्या वतीने धनगर समाजाला एसटी संवर्गत समाविष्ट करावे या मागणीसाठी उपोषण आंदोलन सुरू आहे. आज या आंदोलनाचा पंधरावा दिवस आहे. तरी देखील सरकार आणि आंदोलनकर्ते यांच्यातील चर्चेतून अद्याप तोडगा निघालेला नाही. दरम्यान या ठिकाणी उपोषणाला बसलेल्या एका आंदोलनकर्त्यांची प्रकृती बिघडल्याने त्याला पुणे येथे हलवण्यात आले आहे. त्याला आधीच अहमदनगर येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्याच्या प्रकृतीत जास्त सुधारणा झाली नव्हती. मराठा आरक्षणासाठी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे यांनी उपोषण सुरू केले होते. त्यानंतर राज्यभरातून या आंदोलनाला पाठिंबा मिळाला. अखेर राज्य सरकारला आरक्षणासाठी पुढाकार घ्यावा लागला आहे. त्यासाठी मराठा समाजाने चाळीच दिवसांची मुदत दिली आहे. याच दरम्यान धनकर समाजाच्या आरक्षणासाठी देखील चौंडी येथे उपोषण आंदोलन सुरू करण्यात आले होते.

### आरक्षणावर अद्याप तोडगा नाही

**» अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी येथे यशवंत सेनेच्या वतीने धनगर समाजाला एसटी संवर्गत समाविष्ट करावे या मागणीसाठी उपोषण आंदोलन सुरु आहे. आज या आंदोलनाचा पंधरावा दिवस आहे. तरी देखील सरकार आणि आंदोलनकर्ते यांच्यातील चर्चेतून अद्याप तोडगा निघालेला नाही. दरम्यान या ठिकाणी उपोषणाला बसलेल्या एका आंदोलनकर्त्यांची प्रकृती बिघडल्याने त्याला पुणे येथे हलवण्यात आले आहे. त्याला आधीच अहमदनगर येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्याच्या प्रकृतीत जास्त सुधारणा झाली नव्हती.**

# मालमत्तेच्या वादातून जादुटोण्याचा प्रकार

## सहाजणांविरुद्ध जादुटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मालमत्तेच्या वादातून अघोरी कृत्य केल्याप्रकरणी पोलिसांनी मांत्रिकासह सहाजणांविरुद्ध जादुटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला. याबाबत अनिकेत विनोद सुपेकर (वय २८, रा. जनवाडी) याने चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार कांता सुरेश चव्हाण (वय ७०), गिरीश सुरेश चव्हाण (वय ३५, दोघे रा. जनवाडी, गोखलेनगर), संगीता सुपेकर (वय ४५), स्वप्नील सुपेकर (वय २३), सोनल प्रवीण सुपेकर, तसेच मांत्रिक स्वप्नील भोकरे (तिघे रा. कोथरुड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अनिकेत, त्याची आजी कांता चव्हाण हे जनवाडी भागात राहायला आहेत. अनिकेतच्या वडिलांनी दुसरा विवाह केला आहे. त्याची सावत्र आई कोथरुड भागात राहायला आहे. अनिकेतच्या पणजीच्या नावावर दोन खोल्या आहेत. मालमत्तेवरुन अनिकेत आणि आरोपींमध्ये वाद सुरू होते. अनिकेतच्या आईची साडी चोरीला गेली होती. अनिकेतने परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासले. तेव्हा आजी कांता आणि परिसरातील एका तरुणीने साडी चोरल्याचे दिसून आले. महिनाभरापूर्वी अनिकेत आजीच्या घरात गेला. तेव्हा अनिकेतची आई, काकू, मावशी यांची छायाचित्रे ठेवली होती. चोरलेल्या साडीजवळ टाचण्या लावलेले लिंबू ठेवले होते. मांत्रिक स्वप्नील भोकरे मंत्रोच्चार करत होता. अनिकेतने याप्रकाराबाबत विचारणा केली. तेव्हा आम्ही तुम्हाला मारुन टाकणार आहोत, अशी धमकी त्याला देण्यात आली. घाबरलेल्या अनिकेतने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस निरीक्षक जगन्नाथ जानकर तपास करत आहेत.

# पुणे महापालिकेकडून वैशाली हॉटेलवर हातोडा!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** फर्ग्युसन रस्त्यावरील हॉटेल वैशाली आणि क्रीम्स शॉप स्टोरी या हॉटेलवर महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये एकूण ३ हजार ५०० चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले.शिवाजीनगर भागातील फर्ग्युसन रस्त्यावरील हॉटेल वैशाली आणि क्रीम्स शॉप स्टोरी या हॉटेलकडून अनधिकृत शेड घालण्यात आले होते. त्यानुसार बांधकाम विभागाकडून ही कारवाई करण्यात आली. बांबू आणि पत्र्यांच्या सहाय्याने बांधलेल्या शेडचा समावेश आहे. वैशाली हॉटेलमधील टेरेस आणि सामासिक अंतरातील सर्व विनापरवाना शेड कारवाई करून हटविण्यात आल्या. यावेळी पक्के उभारलेले शेड गॅस कटरच्या सहाय्याने कापण्यात आल्याची माहिती पालिकेच्या बांधकाम विभागाकडून देण्यात आली. पोलीस बंदोबस्तामध्ये कार्यकारी अभियंता बिपीन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उप अभियंता सुनील कदम, शाखा अभियंता राहुल रसाळे, कनिष्ठ अभियंता समीर गढई यांनी ही कारवाई केली. घरपाडी विभागाकडील दहा बिगारी, एक पोलीस गट या कारवाईत सहभागी झाला होता. हॉटेलकडून पुन्हा शेड उभारण्यात आली तर गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी माहिती सुनील कदम यांनी दिली.